**सन २०१७ मध्ये कापूस पिकावर बोडअळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे नुकसानीसाठी मदतीचा निधी वितरीत करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वन विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक : सीएलएस-२०११/प्र.क्र.३२०/म-३**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ३० जून, २०२२

**संदर्भ :** १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.सीएलएस-२०१७/प्र.क्र.३२०/म-३, दि.१७.०३.२०१८
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.सीएलएस-२०१७/प्र.क्र.३२०/म-३, दि.०८.०५.२०१८
३) मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचे आदेश दिनांक ०८.०६.२०२२
४) जिल्हाधिकारी, जळगाव यांचे पत्र क्र.टंचाई-३/ई टपाल/२०२१/७/५१/६२५, दि.१६.०६.२०२२

**प्रस्तावना**:

सन २०१७ च्या खरिप हंगामामध्ये राज्यात कापूस पिकावर बोंडअळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे तसेच धान पिकावर तुडतुडे रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे कापूस व धान पिकांचे नुकसान झालेले होते. सदर नुकसानीकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत दि.०५.१२.२०१७ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सर्व विभागीय आयुक्तांना संदर्भाधीन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये रू.३४८४६१.२५ लक्ष एवढा निधी तीन हप्त्यात वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जळगाव जिल्हयाकरिता रू.४३९९६.०० लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आला. तद्नंतर जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दि.०२.०८.२०१९ च्या पत्रान्वये अतिरिक्त निधीची मागणी केली होती. सदरची निधी मागणी ही ३३% पेक्षा कमी बाधित झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता असल्याने अमान्य करण्यात आली. तद्नंतर जळगांव जिल्ह्यातील एरंडोल व पारोळा शेतकरी मदतीपासून वंचीत राहिले असल्याने मदतीची रक्कम मिळण्यासाठी मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्र.६६९/२०२१ मा. उच्च न्यायालयाने दि.०८.०६.२०२२ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी रू.११,७०,१४,०००/- इतके वाढीव अनुदान उपलब्ध करून देण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, जळगाव यांनी संदर्भाधीन क्रमांक ४ येथील पत्रान्वये सादर केला आहे. त्यानुसार बाधित शेतकऱ्यांना मदतीचे वाटप करण्यासाठी निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय**</u>: -

मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या, औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या आदेशानुसार सन २०१७ च्या खरिप हंगामामध्ये राज्यात कापूस पिकावर बोंडअळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे कापूस पिकांचे नुकसानीकरिता जिल्हाधिकारी,जळगाव यांना अतिरिक्त रू.११,७०,१४,०००/- (अक्षरी अकरा कोटी सत्तर लक्ष चौदा हजार फक्त) एवढा निधी विभागीय आयुक्त, नाशिक यांच्यामार्फत वितरीत करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या सहपत्राप्रमाणे लेखाशीर्षनिहाय निधी बीम्स प्रणालीवर विभागीय आयुक्त, नाशिक यांना कार्यासन म-११ यांनी तात्काळ वितरित करावा.

३. वरील निधी खर्च करताना संदर्भाधीन सर्व शासन निर्णयातील सुचनांचे व निकषांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक १७.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मदतीचे दर मंजूर करण्यात आले आहेत. त्या वाढीव दरापैकी **राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या (SDRF) संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयातील दराने** मदत प्रदान करण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या लेखाशीर्षाखाली वितरित करण्यात आलेला निधी खर्च करण्यात यावा. ज्या प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी सदर निधी खर्च करण्यात यावा.

४. पंचनामे करण्यात आल्यानंतर लाभार्थी निश्चित करण्यात यावेत. या शासन निर्णयान्वये संपूर्ण रक्कम बीम्स प्रणालीवर वितरित करण्यात येत असली तरी, लाभार्थी निश्चित झाल्यानंतर वित्तिय शिस्तीच्या दृष्टीकोनातून संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्रत्यक्ष गरजेनुसारच कोषागारातून रक्कम आहरित करून त्यानंतरच रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट ऑनलाईन पध्दतीने हस्तातंरित करण्यात यावी. सदर निधी अनावश्यकरित्या कोषागारातून आहरित करून बँक खात्यामध्ये काढून ठेवण्यात येवू नये. या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाच्या मर्यादेतच खर्च करण्यात यावा. <u>**लाभार्थ्याना मदत वाटपाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्हयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा**</u> तसेच राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च करण्यात येणाऱ्या निधीची माहिती केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने विकसित केलेल्या NDMIS या प्रणालीमध्ये नोंदविण्यात यावी. सर्व सुचनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

५. सदर निधीतून करण्यात येत असलेल्या खर्चाचे लेखे निधी आहरित करण्यात येणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्यात यावे व करण्यात आलेल्या खर्चाचा कोषागार कार्यालये व महालेखापाल कार्यालयाशी त्रैमासिक ताळमेळ घेण्यात यावा. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून तसेच राज्य शासनाच्या निधीमधून उपलब्ध करून दिलेला उपरोक्त निधी खर्ची पडल्यानंतर तातडीने निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधितांकडून प्राप्त करून घेवून एकत्रितरित्या शासनास सादर करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त यांची राहील.

**६.** वरील प्रयोजनासाठी प्रधान लेखाशीर्ष २२४५- नैसर्गिक आपत्तीच्या निवारणार्थ सहाय्य, ०२, पूर, चक्रीवादळे इत्यादी, १०१, अनुग्रह सहाय्य (९१) **राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च**, (९१)(०५) नैसर्गिक आपत्तीमुळे पीक नुकसानीकरिता शेतकऱ्यांना सहाय्य ,३१ सहाय्यक अनुदाने **( २२४५ २४५२)** अंतर्गत या उद्दीष्टाखाली निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**७.** सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक : २२६/२०२२/व्यय-९, दिनांक २२.०६.२०२२ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२२०६३०११२७४६२६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by Sanjay Audumbar Dharurkar
Date: 2022.06.30 12:56:20 +05'30'

**( संजय औ. धारूरकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानभवन,मुंबई
३. विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य,
४. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
५. अपर मुख्य सचिव ( वित्त ), मंत्रालय,मुंबई,
६. विभागीय आयुक्त, नाशिक,
७. जिल्हाधिकारी, जळगाव,
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
९. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव,
११. मा.मंत्री ( मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१२. मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१३. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१४. रजिस्टार, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद,
१५. कार्यासन अधिकारी (म-११/म-३), मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१६. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
१७. निवड नस्ती (कार्यासन/ म-३ )